# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## मा.क्रिडा समिती

## कार्यपत्रिका क्रमांक :- ३

## सभावृत्तांत

दिनांक :- ४/०८/२०१० वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ४/८/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले - सभापती

२) मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब - उपसभापती

३) मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

४) मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

याशिवाय मा.गायकवाड - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - उपनगरसचिव मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्रमांक :-१) सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व. संस्था/मंडळे यांना अनुदान अदा केलेबाबत कार्योत्तर मान्यता घेणेबाबत..

विषय क्रमांक :- २) शालेय व महाविद्यालयीन म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूंना अदा केल्या जाणाऱ्या क्रीडा शिष्यवृत्ती रक्कमेत वाढ करणेबाबत... मा.मच्छिंद्र तापकीर, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ३) सार्वजनिक संस्था/मंडळे यांना सेवाशुल्क तत्त्वावर कराराने चालविण्यास दिलेल्या म.न.पा. व्यायामशाळांचा करार संपुष्टात येत असल्याने मुदतवाढ देणेबाबत... मा.मच्छिंद्र तापकीर, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ४) शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१०-२०११ आयोजनाकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत... मा.मच्छिंद्र तापकीर, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव..

--------------

दिनांक २१/०७/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -

ठराव क्रमांक :-११ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ४/८/२०१० विभाग :- क्रिडा
सुचक :- मा.मच्छिंद्र तापकीर अनुमोदक :- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ :- मा.अतिरीक्त आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/३/कावि/३३०/२०१० दि.३०/७/२०१०

मा.अतिरीक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २००९ - २०१० या आर्थिक वर्षात मा. महापालिका सभा ठराव क्र.८१३ दि.१५/०२/२०१० अन्वये १) साई संस्कार संस्था, चिंचवड र.रू.२,९०,०००/- २) चैतन्य महिला मंडळ, भोसरी र.रू. २,९०,०००/- ३) स्वाभिमानी महिला मंडळ, आनंदवन कुष्ठ वसाहत, दापोडी र.रू.१,००,०००/- या संस्थांना अनुदान अदा करण्यास मान्यता दिलेली असून उर्वरीत १) कल्याणी मतीमंद विद्यालय, चिखली र.रू.१,२७,५७७/- २) श्री ब्रम्हदत्त शिक्षण प्रसारक मंडळ, निगडी र.रू.२,९०,०००/- ३) मातोश्री प्रतिष्ठाण व्दारा संचालित मातोश्री निराधार बाल आश्रम, पिंपळे गुरव र.रू.४२,५४९/- ४) आस्था बहुउद्देशिय संस्था, भोसरी र.रू.२,९०,०००/- या ४ संस्थेस अनुदान अदा केल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :-१२ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०४/०८/२०१०
सुचक :- मा.मच्छिंद्र तापकीर अनुमोदक :- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ :- मा.मच्छिंद्र तापकीर, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव -

मनपा परिसरातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडुंना प्रोत्साहन मिळुन मनपा परिसरातील जास्तीत जास्त राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडु तयार होण्याच्या दृष्टीने मनपाच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या क्रीडा शिष्यवृत्ती रकमेत वाढ करणे आवश्यक असल्याने सन २००९ - १० वर्षापासून महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेतर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रु.१८००/- ऐवजी र.रु.३०००/- तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रु.१८००/- ऐवजी र.रु.३०००/- राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा

स्पर्धा (नॅशनल स्कुल गेम/स्कुल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रु.३०००/- ऐवजी र.रु. ५०००/- या प्रमाणे क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :-१३ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- ०४/०८/२०१०

सुचक :- मा.मच्छिंद्र तापकीर अनुमोदक :- मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ :- मा.मच्छिंद्र तापकीर, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव -

प्रस्तावात नमुद प्रमाणे १)मुंजाबा चौक पिंपळे सौदागर व्यायामशाळा,२)कै.वस्ताद मुरलीधर माचुत्रे तालेरानगर व्यायामशाळा ३)कै.आण्णासाहेब मगर जल.तलावाजवळील व्यायामशाळा ४) सावित्रीबाई फुले व्यायामशाळा ५) लोंढे विटभट्टी व्यायामशाळा ६) मासुळकर कॉलनी व्यायामशाळा या ६ व्यायामशाळा सार्वजनिक संस्थांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिल्याचा करार रकाना क्र.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संपुष्टात येत असल्याने, रकाना क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुदतवाढ व रकाना क्र.६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सेवाशुल्क देऊन, मनपा व्यायामशाळा कराराने चालविण्यास देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :-१४ विषय क्रमांक :- ४

दिनांक :- ०४/०८/२०१०

सुचक :- मा.मच्छिंद्र तापकीर अनुमोदक :- मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ :- मा.मच्छिंद्र तापकीर, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव -

प्रस्तावाप्रमाणे जिल्हास्तर शालेय ४७ खेळ प्रकारांच्या क्रीडा स्पर्धा २०१० - २०११ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर पंच मानधन पंच चहा - अल्पोपहार भत्ता, नारळ,बुके, पुजा खर्च, स्टेशनरी खर्च,साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे, कुस्ती मॅट, पी.एम.पी.एम.एल बस खर्च इतर खर्च इत्यादी, सन २०१० - २०११ मध्ये विभागीयस्तर स्पर्धेसाठी मनपा शाळेतील अंदाजे ४५० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर २५०, राष्ट्रीय पातळीवर ७५ व संघटनेमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी १०० शालेय खेळाडू, त्यांच्या समवेत जाणारे क्रिडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च इ.अदा करणेकामी अंदाजे र.रु.३,००,०००/- तसेच खाजगी शाळा १९ क्रीडा स्पर्धा आयोजित करणार असल्याने, त्यांना स्पर्धेचा खर्च र.रु.१,१९,३७०/- अदा करणे असे एकुण येणा-या संभाव्य खर्च र.रु. १७,११,८६६/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च “क्रिडा निधी वार्षिक क्रीडा स्पर्धा व क्रीडा कला साहित्य खरेदी” या लेखाशिर्षावर केलेल्या तरतुद र.रु.३०,००,०००/- मधुन खर्ची टाकणेस तसेच जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा

अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था,ध्वनी/विद्युत व्यवस्था,मैदान तयार करणे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ.स्वरुपाचा खर्च हा प्रभाग कार्यालया मार्फत होणार असल्याने त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च प्रभागाचे अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[ राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/१०५६/२०१०
दिनांक :- ७ /०८/२०१०

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत :- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.